**<u>अर्जदारातर्फे साक्षीदार क्र.२ यांचा सरतपास वकील श्री. एस. व्ही. कुलकर्णी यांचेतर्फे शपथेवर पुन्हा सुरु</u> –**

**०७.** मी सदर प्रकरणात माझ्या साक्षीचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**<u>साक्षीदाराचा उलटतपास सामनेवाला करिता वकील श्री. आर. ए. औताडे यांच्यातर्फे–</u>**

**०८.** हे म्हणणे खरे नाही की, मी जमीन खरेदी विक्रीचा व्यवसाय करतो आणि त्याच माध्यमातून पैशाची देवाण घेवाण सुध्दा करतो. हे म्हणणे खरे नाही की, मौजा भैरवनाथनगर गट क्रमांक २९ मधील ४१ आर जमीन व गट क्रमांक १९/४ मधील ८० आर जमीन ही माझी वडिलोपार्जित शेतजमीन आहे. भाउसाहेब तुकाराम कांदळकर, भागवत तुकाराम कांदळकर व राजेंद्र तुकाराम कांदळकर हे माझे भाउ आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आमच्यामध्ये आपसात वाटणी होवून सर्व भावांना त्या वाटपानुसार सर्वांच्या हिस्स्याला ४१ आर जमीन आलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर शेतजमीन मी वडिलोपार्जित जमीनीतून मिळालेल्या उत्पन्नातून खरेदी केलेली आहे. सदर जमीन मी विकत घेतली हे दाखविण्याकरिता मी सदर प्रकरणात कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्यासंबंधीचा कागदोपत्री पुरावा मी प्रकरणात दाखल करण्यास तयार आहे. हे म्हणणे खरे नाही की, मौजा भैरवनाथनगर गट क्रमांक २९ मधील ४१ आर जमीन व गट क्रमांक १९/४ मधील ८० आर जमीनीमध्ये अर्जदार व माझी दोन मुले यांचा अविभक्त हिस्सा आहे. हे म्हणणे खरे नाही की, भैरवनाथनगर येथे माझे वडिलोपार्जित घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर घरामध्ये अर्जदार व माझी दोन मुले यांचा अविभक्त हिस्सा आहे.

**०९.** अर्जदार हिचे डी.एम.एल.टी. पर्यंत शिक्षण झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, लग्नापुर्वी अर्जदार ही लॅब असिस्टंट म्हणुन काम करीत होती. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हिला तिच्या शिक्षणाच्या आधारे सहज नोकरी मिळु शकते किंवा ती स्वतःचा व्यवसाय सुरु करु शकते. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हिने नोकरी मिळण्याकरिता कोठेही प्रयत्न केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हिला सामनेवाला याच्याकडून पोटगी मंजुर व्हावी या कारणामुळे मी अर्जदार हिला कोठेही नोकरी करु दिली नाही तसेच अर्जदार हिने सुध्दा कोठेही नोकरी केली नाही.

**१०.** मला दोन मुले असून दोन्हीही मुले प्रभात डेअरी मध्ये काम करतात. माझ्या दोन मुलापैकी एका मुलाचे लग्न झालेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यावर माझी दोन मुले किंवा इतर कोणीही अवलंबून नाही. सामनेवाला हा ट्रॅव्हलिंगचा व पैशाचा देवाण घेवाण करण्याचा व्यवसाय करतो हे दाखविण्याकरिता मी कोणताही कागदोपत्री पुरावा प्रकरणात दाखल केला नाही. सामनेवाला याचा व्यवसाय दाखविण्याकरिता माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी हे खोटे सांगत आहे की, सामनेवाला याचा ट्रॅव्हलिंगचा व पैशाचा देवाण घेवाण करण्याचा व्यवसाय आहे.

**११.** सामनेवाला हा दरमहा दीड लाख रुपये उत्पन्न कमवितो हे दाखविण्याकरिता माझ्याकडे कोणताही कागदोपत्री पुरावा नाही व तसा मी प्रकरणात कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. सामनेवाला हा १२ वी नापास आहे. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला हा मजुरीचे काम करतो. सामनेवाला याचे वडील मयत झालेले आहेत. सामनेवाला यास वृध्द आई व चार बहिणी आहेत. सामनेवाला याच्या तीन बहिणीचे लग्न झाले असून एक बहीण अविवाहीत आहे. हे मला माहिती नाही की, सामनेवाला याच्या आईला मायग्रेनचा त्रास असून त्याकरिता ती नाशिक येथील दवाखान्यात नियमित उपचार घेत असते किंवा नाही. सामनेवाला याची एक बहिण सुजाता ही अविवाहीत असून ती अपंग सुध्दा आहे. हे मला माहिती नाही की, सामनेवाला याची बहिण हिचा उपचार नाशिक व पुणे येथे नियमित सुरु असतो किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला याचा आई व बहिणीच्या उपचाराकरिता फार मोठा खर्च होत असतो किंवा नाही. हे मला माहिती नाही की, सामनेवाला याची आई व बहिण हे सामनेवालावर अवलंबून आहे किंवा नाही. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला याची आई व बहिण यांच्याकडे कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. हे मला माहिती नाही की, वाहन क्रमांक एमएच१७/डीएक्स-३११३ ही टुरिस्ट पासिंग वाहन आहे किंवा नाही. हे मला माहिती नाही की, सामनेवाला याच्या नावे असलेल्या वाहनावर महिंद्रा ॲण्ड महिंद्रा फायनान्सचे कर्ज आहे किंवा नाही.

**१२.** हे मला माहिती नाही की, सामनेवाला याने सदर वाहन हे केवळ त्याच्या आईला व बहिणीला उपचाराकरिता आणणे नेणे करण्याकरिता घेतलेली आहे किंवा नाही. हे म्हणणे खरे आहे की, अर्जदार हिने सामनेवाला यास दिनांक १२/०६/२०२४ रोजी पाठविलेल्या नोटीसचे उत्तर दिनांक २४/०६/२०२४ रोजी सामनेवाला याने अर्जदार

हिला पाठविले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर नोटीस उत्तराद्वारे सामनेवाला याने अर्जदार हिला नांदावयास येण्याची विनंती केली होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर नोटीस उत्तर प्राप्त झाल्यानंतर अर्जदार ही सामनेवालासोबत नांदावयास गेली नाही तसेच उत्तर नोटीसला अर्जदार हिने पुन्हा उत्तर दिले नाही.

**१३.** हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार व सामनेवाला यांच्या लग्नाकरिता सामनेवाला याने कर्ज काढून लग्नाकरिता मला रक्कम रुपये एक लाख दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार ही नेहमी सामनेवाला याची आई व बहिण यांच्यासोबत भांडण करुन वेगळे राहण्याबाबत सामनेवाला यास म्हणत होती. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हिला मोबाईलवर लुडो, पब–जी इत्यादी गेम खेळण्याचा छंद होता. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार ही सामनेवाला सोबत नांदत असतांना अर्जदार हिचा वाढदिवस असतांना माझ्या दोन्ही मुलांनी सामनेवाला यास फोन करुन वाढदिवसानिमित्त अर्जदार हिला स्कुटर व नवीन मोबाईल घेवून दयावा असे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला याने अर्जदार हिला तिच्या वाढदिवसानिमित्त कर्ज घेवून रक्कम रुपये ३५,०००/– चा मोबाईल घेवून दिला होता. माझ्या मुलाच्या लग्नाकरिता मी व अर्जदार आम्ही दोघे सामनेवाला यास रक्कम रुपये दोन लाखची वारंवार मागणी करीत होतो.

**१४.** सन २०२३ मधील दिवाळी सणाकरिता मी अर्जदार हिला माहेरी घेवून आलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, तेव्हापासुन अर्जदार ही माहेरी राहत आहे. सन २०२३ दिवाळी सणाकरिता माहेरी आली तेव्हापासुन अर्जदार ही सासरी नांदावयास गेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी हे खोटे सांगत आहे की, सामनेवाला याने स्वतःहून अर्जदार हिचा त्याग केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मागणीनुसार सामनेवाला याने मला रक्कम रुपये दोन लाख दिले नाही त्यामुळे मी अर्जदार हिला सामनेवालाकडे नांदावयास पाठविले नाही.

**१५.** हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार व सामनेवाला हे दोघेही शिर्डी येथे वेगळे राहत होते. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार ही सामनेवाला यास स्वतः पेटून घेण्याची धमकी देत असे, घरातील दरवाजा बंद करुन घेत असे, आत्महत्या करण्याचा प्रयत्न करीत असे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हिच्या वागण्याबाबत सामनेवाला याने मला वारंवार कळविले सुध्दा होते.

**१६.** हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हिने पार्लर व मेंहदी काम, शिलाई इत्यादी

प्रशिक्षण घेतलेले आहे. हे म्हणणे खरे नाही की, वरील व्यवसायामधून अर्जदार ही दरमहा तीस ते चाळीस हजार रुपये उत्पन्न कमविते. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार ही डी.एम.एल.टी. या शिक्षणाच्या आधारे आज सुध्दा नोकरीला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यापासुन अर्जदार हिला दरमहा पंचवीस हजार रुपये इतके उत्पन्न मिळते. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला याच्यावर वेगवेगळे कर्ज असल्यामुळे त्याची परतफेड त्यास महिन्याकाठी करावी लागत असल्यामुळे सामनेवाला हा अर्जदार हिला तिच्या मागणीनुसार पोटगी रक्कम देण्यास समर्थ नाही. हे म्हणणे खरे नाही की, सामनेवाला याची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्यामुळे तो अर्जदाराच्या मागणीनुसार पोटगी रक्कम देवु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सामनेवाला याच्याविरुद्ध पुरावाच्या शपथपत्रामध्ये केलेले सर्व आरोप खोटे केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर प्रकरणात माझ्या साक्षीचे खोटे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

JITENDRA DUDHRAM JADHAO

Digitally signed by JITENDRA DUDHRAM JADHAO
Date: 2025.09.04 13:56:03 +0530

ठिकाण : श्रीरामपुर.

दिनांक : ०४/०९/२०२५.

**(जितेंद्र दु. जाधव)**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, श्रीरामपुर.